क्र.साप्रवि/रवका/न.क्र.२२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १७० दिनांक ११ / ०९ / २००८

विषय : मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना औद्योगिक प्रशिक्षण (आय.टी.आय.) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अतिरिक्त दोन संधी देण्याबाबत.

संदर्भ : सामान्य आदेश क्र.१५९ (क), दिनांक ३०/०६/२००४

--------

सा.आ.क्र. १५९(क), दिनांक ३०/०६/२००४ अन्वये मृत कर्मचाऱ्यांच्या अर्हतारहीत अवलंबितांना 'वीजतंत्री' या शाखेचे एक वर्षाचे औद्यागिक प्रशिक्षण कंपनीतर्फे देण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली असून या आदेशातील शर्ती व अटींनुसार प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर आद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये अवलंबित अनुत्तीर्ण झाल्यास त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी जादा दोन संधी देण्यात आल्या आहेत. या दोन जादा संधी देऊनही काही अवलंबित सदर परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत असे निदर्शनास आल्याने अशा अवलंबितांना परीक्षेस बसण्यासाठी अतिरिक्त संधी देण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) आणि संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करुन मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास आय.टी.आय. परीक्षा उतीर्ण होण्यासाठी आणखी दोन अतिरिक्त संधी देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. अनुत्तीर्ण अवलंबितास संचालक, व्यावसायिक प्रशिक्षण आणि शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी घेतलेल्या परीक्षेस बसण्यासाठी दोन अतिरिक्त संधी दिल्या जातील. तसेच, या वाढीव कालावधीत मासिक निर्वाह भत्त्याचा लाभ चालू राहील. तथापि, परीक्षा शुल्काचा खर्च हा अवलंबितासच करावा लागेल.

४. सा.आ.क्र.१५९(क), दिनांक ३०/०६/२००४ मधील इतर तरतूदी व अटी अबाधीत राहतील.

५. सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या अखत्यारितील अशी प्रलंबित प्रकरणे या तरतुदीनुसार निकाली काढावीत.

६. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(सु.य.पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :

१) क्षेत्रीय कार्यालयातील उप विभागीय आणि त्यावरील स्तराच्या कार्यालयांना
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

२) महावितरण कंपनीच्या निगम कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख.

D:\O&M\Adm.Cir - २२.doc